# Greenlawns School - Worli

Terminal Examination - 2017 - 2018

कक्षा :- सातवी | पूर्णांक :- 80

विषय :- मराठी

दिनांक :- 21.09.2017 | समय :- 2 घण्टे

---

सूचना :- 1. सगळे प्रश्न अनिवार्य आहेत.

2. शुद्ध भाषा एवं सुवाच्य लेखन अपेक्षित आहे.

---

विभाग - अ

भाषा - विभाग (Marks - 40)

प्रश्न 1) खालीलपैकी एका विषयावर 12 – 15 ओळींचा निबंध लिहा :- (08)

i. माझी शाळा

ii. माझा प्रिय मित्र । माझी प्रिय मैत्रीण

iii. मी परी झाले तर ..........

प्रश्न 2) खालील मुद्दयांच्या आधारे गोष्ट तयार करून योग्य शीर्षक द्या व तात्पर्य लिहा :- (5)

रामू गरीब मुलगा ..... शिक्षणाची आवड ..... लहान मुलाला सांभाळण्याचे काम ..... शाळेजवळ जाऊन खेळवणे ..... खिडकीतून शिक्षकांचे बोलणे ऐकणे ...... रात्री सर्व झोपल्यावर पाठांतर ..... शिक्षण अधिकाऱ्यांची शाळेत भेट ..... मुलांना प्रश्न ..... बाहेरुन उत्तर देणे ..... रामूला वर्गात बोलावणे ..... मोफत शिक्षणाची सोय ..... तात्पर्य.

प्रश्न 3) खालील उतारा वाचून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दांत लिहा :- (10)

तानबाने त्या गुंडांचे बोलणे स्पष्ट ऐकले होते. गावच्या सरपंचाला मारण्याचा त्यांचा बेत त्याने ओळखला. तो चिंतित झाला. कारण गावचा सरपंच हा देवमाणूस होता. गावची तो नि:स्वार्थपणे सेवा करीत होता. गावच्या निराधार लोकांना त्याचा खूप आधार होता. गावची मुले शिकावीत , गावचे

---

आरोग्य चांगले राहावे , शेती , उद्योग चांगले चालावेत म्हणून तो खूप झटत होता. गुंडांचा बंदोबस्त व्हावा म्हणून तो सतत शहरात जायचा. शासनाकडून त्यासाठी मदत मागायचा.

अनेकदा प्रयत्न करूनही केवळ सरपंचांच्या जागरुकतेमुळे गावच्या कुणासही गुंड लुबाडू शकले नव्हते. म्हणूनच सरपंचांचा काटा काढायचा त्यांनी कट रचला होता. मग अशा हितकारी सज्जनाची हत्या होऊ द्यायची ? आता काय करायचे ? तो मनात सारखा विचार करत होता.

प्रश्न :-

i. कोण चिंतित झाला होता व का ? (2)

ii. देवमाणूस कोण होता ? (1)

iii. सरपंच कशासाठी झटत असे ? (2)

iv. सरपंच कोणाकडूनही कोणती मदत मागायचे ? (2)

v. सरपंचाचा काटा काढण्याचा गुंडांनी कट का रचला ? (1)

vi. वाक्य बनवा :- सेवा , शेती (2)

## व्याकरण - विभाग

प्रश्न 4) अ) समानार्थी शब्द लिहा :- (2)

1. हुकूम 2. मजा
3. ध्वज 4. माता

आ) विरुद्धार्थी शब्द लिहा :- (2)

1. विश्वास 2. दाट
3. आत 4. सशक्त

इ) वचन बदला :- (2)

1. राजवाडा 2. मशाल
3. झाडे 4. धर्म

ई) लिंग बदला :- (2)

1. पेटी
2. चिमणा
3. माळी
4. कवी

उ) अशुद्ध शब्द शुद्ध करा :- (2)

1. बांबु
2. सरि
3. पूणे
4. अंडि

ऊ) वाक्प्रचारांच्या अर्थाच्या जोड्या लावा :- (2)

| वाक्प्रचार | अर्थ |
|---|---|
| 1. धारातीर्थी पडणे | i. सल्ला देणे |
| 2. हुतात्मा होणे | ii. रणांगणावर मरण येणे |
| 3. कानमंत्र देणे | iii. सामना करणे |
| 4. दोन हात करणे | iv. देशासाठी मरण पत्करणे |

क) खालील दिलेल्या वाक्यातील सर्वनामे ओळखून त्यांचे प्रकार लिहा :- (2)

1. डोंगराच्या माथ्यावर कोण काम करी ?
2. मी मुंबईला राहतो.

ख) खालील दिलेल्या वाक्यातील विशेषणे ओळखून त्यांचे प्रकार लिहा :- (2)

1. वर्गात दोन विद्यार्थी बसले आहेत.
2. मोर सुंदर पक्षी आहे.

ग) क्रियापद ओळखा :- (1)

1. ते पेटीला कुलूप लावत.
2. लहुजी तरुणांना वीरांच्या गोष्टी सांगत.

विभाग - ब

साहित्य - विभाग (40 Marks)

प्रश्न 5) अ) खालील प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा :- (12)

i. पप्पूला पिल्लांच्या कोणत्या गोष्टी पाहण्यात मजा वाटे ?

ii. लहुजींनी आपल्या जीवनाचे कोणते ध्येय ठरविले ?

iii. दिवाणजी पेटीतील वस्तूंचे दर्शन कोणत्या उद्देशाने घेत असत ?

iv. आईने घरटे का काढून टाकले होते ?

आ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :- (4)

i. घरटे बांधण्यासाठी चिमणा - चिमणीने कोणत्या वस्तू आणल्या ?

ii. दिवाणजीच्या पेटीत काय होते ?

iii. राघू साळवे कशात वाकबदार होते ?

iv. लहुजींनी तरुणांना कोणता कानमंत्र दिला ?

इ) खालील रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा :- (4)

i. चिमणीच्या घरट्यात ................ ................ होती.

ii. ............. व .............. यांच्यात खडकी येथे युद्ध झाले.

iii. दिवाणजी ............ आल्यावर सर्वप्रथम ................ लागून असलेलया खोलीत जात.

iv. ................ व ............... शिक्षण मिळावे , असे लहुजींना वाटत होते.

ई) कोण , कोणास ते म्हणाले :- (3)

i. " स्वयंपाकघरात घरअं कसं चालेल ? "

ii. " आतापर्यंत खोलीत काय केलं ? "

iii. " अशाने माझी लायकी मला कळते. "

उ) शब्दार्थ लिहा :- (3)

| | |
|---|---|
| 1. दिवाणजी | 2. आखाडा |
| 3. गुपित | 4. जुलमी |
| 5. धक्का | 6. उदास |

## पद्य - विभाग

प्रश्न 6) अ थोडक्यात उत्तरे लिहा :- (6)

1. कवीने काय विचारु नका, असे म्हटले आहे?
2. पाऊस पडल्यामुळे सृष्टीत काय-काय बदल झाले आहेत?

आ) एका वाक्यात उत्तरे लिहा :- (2)

1. दूरी वर मान करुन का बघत आहे?
2. 'पुसू नका' या कवितेचे कवी कोण?

इ) खालील कवितेच्या ओळी पूर्ण करा :- (4)

सद्‌धर्माचा.................................

.................................................

.................................................

.................................................

.................................................

.................................................

.................................................

................................ डसू नका.

ई) शब्दार्थ लिहा :- (2)

1. ओढा
2. गंध
3. माथा
4. डोळे

---------------- समाप्त ----------------